**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद व तालुका कार्यालय येथे कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनिय अहवाल लिहिण्यासाठी प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

नियोजन विभाग (रोहयो)

शासन निर्णय क्र.गोअअ २०१२/प्र.क्र.५६ /मग्रारो-३

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ६ फेब्रुवारी, २०१३.

**वाचा :**
१) शासन निर्णय नियोजन विभाग क्र : आकृती-२००८/प्र.क्र.१६८/मग्रारो-३, दिनांक २०.११.२००९
२) शासन परिपत्रक नियोजन विभाग क्र : संकीर्ण-२००९/प्र.क्र. १४०/मग्रारो-३, दिनांक १०.५.२०१०
३) शासन निर्णय नियोजन विभाग क्र : आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दि. ३१.५.२०११.
४) शासन शुध्दिपत्रक नियोजन विभाग क्र :आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दिनांक २२.६.२०११.
५) शासन शुध्दिपत्रक नियोजन विभाग क्र :आकृति-२०११/प्र.क्र.५/मग्रारो-३, दिनांक १८.७.२०११.
६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र : सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १.११.२०११.
७) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र : सीएफआर १२१०/प्र.क्र.२१७/तेरा, दिनांक १७.१२.२०११.

**<u>प्रस्तावना</u>:-**

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ च्या अंमलबजावणीसाठी आणि संनियंत्रणाकरिता विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि तालुका स्तरावरील कामात सुसुत्रीकरण करुन पदांचा आढावा घेण्यात येऊन दिनांक २०.११.२००९ च्या शासन निर्णयानुसार विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व तालुका स्तरावरील पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला होता. सदर आकृतीबंधाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व तालुका कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १०.५.२०१० च्या परिपत्रकान्वये प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्यात आले आहेत.

आता राज्यात राबविण्यात येत असलेल्या राज्याची रोजगार हमी योजना व केंद्र शासनाची महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या दोन्ही योजनेतील कामामध्ये मोठा बदल झाल्याने या योजना राबविण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय व तालुका स्तरावरील तहसिल कार्यालय येथील

१०४९ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास वित्त विभागाने गठित केलेल्या उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने शासनाच्या दिनांक ३१.५.२०११ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय व तालुका कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करणे आवश्यक आहे. या प्रयोजनाकरिता सुधारित आदेश लागू करण्यांची बाब शासनाच्यां विचाराधीन होती. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय :-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक (२) येथे नमूद केलेल्या दिनांक १०.५.२०१० च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहेत. तसेच विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय व तालुका कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्यासाठी खालीलप्रमाणे सुधारीत व्यवस्था लागू करण्यात येत आहे :-

**(अ) विभागीय आयुक्त कार्यालय**

विभागीय आयुक्त कार्यालयातील रोजगार हमी योजना कक्षामधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत खालीलप्रमाणे प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त | प्रधान सचिव/ सचिव (रोहयो) |
| २ | अधिक्षक कृषि अधिकारी | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| ३ | कार्यकारी अभियंता (ज.सं.वि.) | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| ४ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.वि.से. गट-अ | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| ५ | लेखा अधिकारी | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| ६ | सहाय्यक लेखाधिकारी | लेखा अधिकारी | उपायुक्त (रोहयो) |
| ७ | कनिष्ठ अभियंता/सहाय्यक अभियंता/ शाखा अभियंता (सा.बां.वि.) | कार्यकारी अभियंता | उपायुक्त (रोहयो) |
| ८ | संशोधन अधिकारी (सांख्यिकी) | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| ९ | संशोधन सहाय्यक (सांख्यिकी) | संशोधन अधिकारी | उपायुक्त (रोहयो) |
| १० | सहाय्यक वनसंरक्षक (फक्त अमरावती व नागपूर) | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| ११ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | उपायुक्त (रोहयो) | विभागीय आयुक्त |
| १२ | अव्वल कारकुन | उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.वि.से. गट-अ | उपायुक्त (रोहयो) |
| १३ | लघुटंकलेखक | उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.वि.से. गट-अ | उपायुक्त (रोहयो) |
| १४ | लिपिक-टंकलेखक | उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.वि.से. गट-अ | उपायुक्त (रोहयो) |
| १५ | लेखा लिपिक | लेखा अधिकारी | उपायुक्त (रोहयो) |
| १६ | वाहन चालक | उपमुख्य कार्यकारी अधिकारी म.वि.से. गट-अ | उपायुक्त (रोहयो) |

**(ब) जिल्हाधिकारी कॉर्यालय**

जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी योजना कक्षामधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत खालीलप्रमाणे प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| २ | उप अभियंता (ज.सं.वि.) | जिल्हाधिकारी | विभागीय आयुक्त |
| ३ | कनिष्ठ अभियंता (सा.बां.वि.) | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ४ | सहाय्यक लेखा अधिकारी (सांख्यिकी) | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ५ | संशोधन सहाय्यक (सांख्यिकी) | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ६ | अव्वल कारकुन | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ७ | लघुटंकलेखक | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ८ | लिपिक-टंकलेखक | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |
| ९ | वाहन चालक | उप जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी |

**(क) जिल्हा परिषद कार्यालय**

जिल्हा परिषद कार्यालयातील रोजगार हमी योजना कक्षामधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याबाबत खालीलप्रमाणे प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी घोषित करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | पदनाम | प्रतिवेदन अधिकारी | पुनर्विलोकन अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | कृषि अधिकारी वर्ग-२ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | गट विकास अधिकारी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | सहाय्यक लेखाधिकारी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ४ | वरिष्ठ सहाय्यक | उप मुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ५ | लिपिक-टंकलेखक | उप मुख्य कार्यकारी अधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |

**(ड) तालुकास्तरीय कर्मचारी**

तालुका कार्यालयातील रोजगार हमी योजना / महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामासाठी कार्यरत असलेल्या अव्वल कारकुन या संवर्गाचे गोपनीय अहवाल लिहिण्यासाठी संबंधित तहसिलदार यांना प्रतिवेदन अधिकारी व संबंधित उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांना पुनर्विलोकन अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. गोपनीय अभिलेख लिहिताना प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांनी सदर शासन निर्णयासोबतच्या प्रपत्रात नमूद केलेल्या बाबींचा विचार करावा. **(प्रपत्र-अ)**

३. शासकीय अधिका-यांचे / कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक : सीएफआर १२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १.११.२०११ अन्वये दिलेल्या सूचनांनुसार शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिण्यात यावेत व जतन करण्यात यावेत.

४. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : सीएफआर १२११/प्र.क्र.२१७/तेरा, दिनांक १७.१२.२०११ मधील तरतुदींप्रमाणे प्रत्येक वर्षी मे महिन्याच्या दुस-या शनिवारी व त्यास जोडून येणा-या रविवारी, विभाग प्रमुखांचा स्तर, प्रादेशिक विभागाचा स्तर, जिल्हा स्तर व तालुका स्तरावर गोपनीय अहवाल प्रतिवेदन करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात यावे. कॅम्पचे आयोजन करण्याची जबाबदारी विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त (महसूल), जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व तालुका स्तरावर तहसिलदार यांची राहिल.

५. या आदेशाची अंमलबजावणी २०१२-१३ च्या गोपनीय अहवाल वर्षापासून लागू राहील.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१३०२०६१०३४३३२४१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

**सोबत** : प्रपत्र - अ

**(प्रशांत र. पिंपळे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत-
१) अ.मु.स. (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
२) प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
३) प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
४) प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
५) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
६) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
७) प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
८) प्रधान सचिव (ग्रामविकास), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२
९) प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
१०) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
११) सर्व विभागीय आयुक्त
१२) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व उपनगर वगळून)
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) सर्व उप आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय.
१५) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, बांद्रा (पू), मुंबई -- ४०० ०५१.
१६) आयुक्त, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१७) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८) सर्व उपजिल्हाधिकारी(रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय (मुंबई शहर व उपनगर वगळून).
१९) उप सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
२०) सर्व अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
२१) सार संग्रहार्थ, कक्ष अधिकारी, मग्रारो-१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.
२२) निवडनस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -- ४०० ०३२.

## प्रपत्र — अ

**गोपनीय अभिलेख लिहिताना प्रतिवेदन अधिकारी व पुनर्विलोकन अधिकारी यांनी लक्षात घ्यावयाच्या बाबी.**

(१) नियोजन विभाग शासन निर्णय मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.४/पुनर्बांधणी — ३/रोहयो-१, दिनांक २७.९.२०१२ मधील तरतुदींनुसार दरमहा क्षेत्र भेटीसाठी ठरवून दिलेल्या मानकानुसार करण्यात आलेली कार्यवाही.

(२) वरिष्ठांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या बाबींची पूर्तता करताना दर्शविण्यात आलेली तत्परता.

(३) पदनिहाय नेमून दिलेल्या कामाचा निपटारा करताना दर्शविण्यात आलेली तत्परता.

(४) शासन स्तरावरुन क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आलेले आदेश/निदेश यांची अंमलबजावणी करताना दर्शविण्यात आलेली तत्परता.

(५) अधिपत्याखालील कार्यालये यांच्यावर नियंत्रण व देखरेख करताना दाखविण्यात आलेली तत्परता.

(६) नरेगा तसेच राज्य रोहयो अंतर्गत जी अपूर्ण कामे आहेत ती पूर्ण करण्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजना.

(७) कार्यालयातील तसेच अधिपत्याखालील कार्यालयातील प्रलंबित विभागीय चौकशीच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना.

(८) शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी उपलब्ध करुन दिला त्या प्रयोजनार्थ निधीचा वापर/ त्या अनुषंगाने सादर करावयाचे उपयोगिता प्रमाणपत्र व महालेखापाल कार्यालयाशी झालेल्या खर्चाचा ताळमेळ घालणे या अनुषंगाने दर्शविलेली कार्यतत्परता.

*******************